विद्यापीठामार्फत माहे मार्च/एप्रिल/मे आणि ऑक्टोंबर/नोव्हेंबर/डिसेंबर अशा दोन सत्रात घेण्यात येणाऱ्या विविध अभ्यासक्रमाच्या परीक्षांच्या केंद्रीय मूल्यमापन प्रकल्पांसाठी प्रशासकीय अधिकारी व प्रकल्प अधिकारी यांचे नियुक्ती संदर्भात.

।। अंतरी पेटवू ज्ञानज्योत ।।

'A' Grade
NAAC Re-accredited
(3rd Cycle)

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

उमविनगर,जळगाव-४२५००१,
परीक्षा मूल्यमापन मंडळ (गोपनीय उत्तरार्ध),
जा.क्र.कबचौउमवि/७आय/१५०७/२०२०
दि.१४ मार्च, २०२०

## परिपत्रक क्र. १३३/२०२०

**प्रस्तावना**: विद्यापीठामार्फत माहे मार्च/एप्रिल/मे आणि ऑक्टोंबर/नोव्हेंबर/डिसेंबर अशा दोन सत्रात विविध परीक्षांचे आयोजन करण्यात येत असते. तसेच परीक्षांच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकनासाठी जिल्हानिहाय व विभागनिहाय एकूण १७ केंद्रांवर केंद्रीय मूल्यमापन प्रकल्प आयोजित करण्यात येत असतात. केंद्रीय मूल्यमापन प्रकल्प पूर्वीचे कामकाजासाठी (Pre Work) व केंद्रीय मूल्यमापन प्रकल्प कामकाजावर नियंत्रण राखण्यासाठी विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयाच्या कार्यरत शिक्षकांमधून विविध विद्याशाखानिहाय प्रशासकीय अधिकारी व प्रकल्प अधिकारी यांची नियुक्ती करण्यात येत असते.

उपरोक्त प्रमाणे कामकाज सुरळीत पार पडणेसाठी विद्यापीठामार्फत संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्थेतील व विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळेतील शिक्षकांना प्रशासकीय अधिकारी व प्रकल्प अधिकारी म्हणून नियुक्ती पत्र पाठविण्यात आल्यानंतर काही शिक्षक केंद्रिय मूल्यमापन प्रकल्पात प्रशासकीय अधिकारी व प्रकल्प अधिकारी म्हणून हजर होत नाहीत,. त्यामुळे केंद्रिय मूल्यमापन प्रकल्पाच्या कालमर्यादीत कामकाजावर परिणाम होत असल्याचे निदर्शनास आल्याने यासंदर्भातील विषय मा.परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या दि.०७/०२/२०२० रोजीच्या सभेत विचारार्थ सादर केला असता, त्यावर सर्वंकष विचारविनीमय करुन ठराव क्र.१२/२०२० अन्वये खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.:-

*"महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ च्या कलम ४८ (४) मधील तरतूदीनुसार विद्यापीठ संलग्नित महाविद्यालय व परिसंस्थेतील तसेच विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळेतील नियुक्त शिक्षकांना परीक्षा व केंद्रीय मूल्यमापन प्रकल्पामध्ये सहाय्य आणि सेवा देणे बंधनकारक असल्याने कबचौउमविशी संलग्नित महाविद्यालये व परिसंस्थेतील तसेच विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळेतील नियुक्त शिक्षकांना केंद्रीय मूल्यमापन प्रकल्पामध्ये प्रशासकीय अधिकारी व प्रकल्प अधिकारी म्हणून विद्यापीठाने नियुक्त केल्यास, त्यांच्या सेवा वर्ग करुन विद्यापीठास सहकार्य करणेबाबत विद्यापीठ प्रशाळांचे संचालक, मान्यताप्राप्त परिसंस्थांचे संचालक तसेच संलग्नित महाविद्यालयांचे मा.प्राचार्यांना कळविण्यात यावे, असे सर्वानुमते ठरले. "*

तरी कृपया, मा.परीक्षा व मूल्यमापन मंडळाने घेतलेल्या उपरोक्त निर्णयाची नोंद घेवून सदर बाब सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून विद्यापीठ प्रशाळा, मान्यताप्राप्त परिसंस्था व संलग्नित महाविद्यालयात नियुक्त शिक्षकांना केंद्रीय मूल्यमापन प्रकल्पात प्रशासकीय अधिकारी व प्रकल्प अधिकारी म्हणून नियुक्ती आदेश आल्यास त्यांच्या सेवा केंद्रीय मूल्यमापन प्रकल्पाच्या कामकाजाकरीता वर्ग करुन केंद्रीय मूल्यमापनाचे काम सुरळीत पार पाडण्यास व निकाल निर्धारीत वेळेत जाहीर करण्यासाठी विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती.

कळावे,

Bhatuprasad Prabhakar Patil

Digitally signed by Bhatuprasad Prabhakar Patil
DN: c=IN, o=Kavayitri Bahinabai Chaudhari North Mh. University, ou=Director Board of Examinations and Evaluation, cn=Bhatuprasad Prabhakar Patil, serialNumber=1c9f78a35972bc358358c30906be0f2f7473da51a8fe8bf8b5ca214dbfe20483, postalCode=425001, 2.5.4.20=503f3136f4b51bc2496a33245787fa1b54e7924915585cb1e82e24ec8c0baf75, st=Maharashtra
Date: 2020.03.16 15:34:44 +05'30'

(भ.प्र.पाटील)
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रति,
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी
संलग्नित सर्व महाविद्यालयांचे मा.प्राचार्य तसेच मान्यताप्राप्त
संस्थांचे व विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळांचे मा.संचालक यांना...